BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)

An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research

Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

भारताच्या आर्थिक विकासावर डिजिटलाझेशनचा प्रभाव

प्रा. डॉ. परमेश्वर लिंबाजी लोडे

(सहाय्यक प्राध्यापक)

अर्थशास्त्र विभाग, आदर्श महाविद्यालय, हिंगोली

Email Id- plllode@gmail.com.

ABSTRACT

सध्याचे युग हे डिजिटलायझेशनचे युग आहे. गेल्या काही वर्षात भारताचे डिजिटल परिवर्तन उल्लेखनिय ठरले आहे. ज्यामध्ये स्मार्टफोन, इंटरनेट, कनेक्टिव्हिटी आणि बँकिंग तंत्रज्ञानाचा जलद वापर डिजिटल अर्थव्यवस्थेत वेगाने वाढ करण्यात यशस्वी ठरला आहे. डिजिटलायझेशनमुळे अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांमध्ये आर्थिक विकासाच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. वेगवान डिजिटलायझेशनचा देशाच्या आर्थिक विकासावर लक्षणीय परिणाम झाला आहे. डिजिटलायझेशनचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम झालेला मुख्य मार्ग म्हणजे ई-कॉमर्स. ई-कॉमर्सने भारतीय अर्थव्यवस्थेवर मोठ्या प्रमाणात प्रभाव टाकला आहे. भारतातील ई-कॉमर्सच्या वाढीमुळे व्यवसायासाठी ग्राहकांपर्यंत पोहचण्यासाठी आणि ग्राहकांसाठी उत्पादने आणि सेवा सुलभ करण्यासाठी नवीन संधी निर्माण झाल्या आहेत. भारत सरकार देखील सक्रियपणे डिजिटल पेमेंटला प्रोत्साहन देत आहे. या सोबतच आर्थिक क्षेत्रांनाही मोठी चालना मिळाली आहे. भारत जसजसा डिजिटल परिवर्तनाच्या मार्गावर पुढे जात आहे तसतसे आर्थिक क्षेत्रात आणखी वाढ आणि विकासाच्या शक्यता वाढत आहेत. भारत डिजिटल दशकात वावरत आहे. भारताच्या GDP मध्ये डिजिटल अर्थव्यवस्था 2026 पर्यंत 20% ने वाढण्याचा अंदाज आहे. आणि भारताची डिजिटल अर्थव्यवस्था 2030 पर्यंत 6 पटीने वाढवून 01 ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचू शकते. भारताची इंटरनेट अर्थव्यवस्था चालू दशकाच्या अखेरीस तिच्या GDP च्या 12-13 टक्के वाढेल. भारत 2047 पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याचे उद्दिष्ट घेऊन पुढे जात आहे. जे डिजिटल अर्थव्यवस्थेला बळकट करूनच साध्य केले जाऊ शकते. डिजिटलायझेशनमुळे आर्थिक विकासाला वेग आला आहे, परंतु आजही अनेक ग्रामीण भागात इंटरनेट कनेक्टिव्हिटी नसल्यामूळे तेथील रहिवासी तांत्रिक माध्यमांचा वापर करू शकत नाहीत. तांत्रिक माध्यमांच्या वापरात फसवणूक आणि बनावटगिरीमूळे अनेक लोक डिजिटल तंत्रज्ञावर विश्वास ठेवण्यास सक्षम नाहीत. भारताच्या आर्थिक विकासावर डिजिटलायझेशनचा परिणाम सकारात्मक झाला आहे. तरीही देशातील सर्व नागरिकांना डिजिटल तंत्रज्ञानाची जाणीव करुन देण्याची गरज आहे. जेणेकरून करून प्रत्येक व्यक्तीला डिजिटलायझेशनचा लाभ होता येईल.

प्रस्तावना:-

21 व्या शतकात असे कोणतेही क्षेत्र नाही ज्यामध्ये डिजिटलायझेशनचा वापर केला जात नाही, असे शिक्षण क्षेत्र, वैद्यकीय क्षेत्र, उत्पादन क्षेत्र, उद्योग क्षेत्र असो किंवा आधुनिक लष्करी तंत्रज्ञान असो सर्वच क्षेत्रात डिजिटायझेशन महत्त्वाचे झाले आहे. अशा परिस्थितीत डिजिटल सबलीकरण ही आता देशातील नागरिकांची मुलभूत गरज बनली आहे. आपल्या भारतातही सर्वच क्षेत्रांमध्ये डिजिटलायझेशन झाले आहे.[1] ज्याचा भारतीय अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम झाला आहे. भारतात डिजिटलायझेशन 2015 मध्ये सुरु झाले. डिजिटल इंडियाचे उद्दिष्ट भारताला तांत्रिकदृष्टया स्वावलंबी बनवणे आहे. आणि

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

भारतात डिजिटल तंत्रज्ञानासह काम करण्याचा ट्रेंड आता शिखरावर पोहचला आहे. लोक मोबाईल 'आणि इंटरनेट व्दारे थेट उत्पादन खरेदी करण्यासाठी ई- कामर्स साईटवर जाणे किंवा उत्पादन शोधणे आणि ॲपव्दारे खरेदी करणे डिजिटल मार्केटिंगच्या श्रेणीमध्ये येते.[2] आजच्या काळात ऑनलाइन शॉपिंग, व्यवहार, बिल पेमेंट, रिचार्ज, तिकिट बुकिंग पेमेंट किंवा मनी ट्रान्सफर इत्यादी गोष्टी अगदी सामान्य झाल्या आहेत. त्यामुळे वेळेचीही बचत होते. कारण एखादी व्यक्ती आपली सर्व कामे घरी बसून सहज करू शकते. डिजिटल क्षेत्रातील कंपन्यांच्या व्यवसायातही दरवर्षी अनेक टक्यांनी वाढ झाली असून या क्षेत्रातील लाखो लोकांना ऑनलाईन व्यवसायाव्दारे रोजगारही मिळाला आहे.[3] भारताची आर्थिक अर्थव्यवस्था पूर्वीपेक्षा खूप वाढली आहे, जी केवळ डिजिटलायझेशनमुळेच शक्य झाली आहे. एकीकडे डिजिटलायझेशनमुळे वेळेची बचत झाली आहे. आणि दुसरीकडे कौटुंबिक बैठकांचं प्रमाणही कमी झालं आहे. आता लोक नातेवाईकांशी मोबाईलवर, इंटरनेट, व्हॉटसॲप किंवा व्हिडिओ कॉलिंगच्या माध्यमातून बोलतात पण एकमेकांच्या घरी भेटायला जात नाहीत. त्यामूळे त्यांच्यातील अंतर वाढत चालले आहे.[4]

Keyword (मुख्य शब्द) :- डिजिटलायझेशन, डिजिटल पेमेंट, ई-गव्हर्नन्स, ई- कॉमर्स इत्यादी

*** शोधनिबंधाची उद्दिष्टये:-**

1) डिजिटलायझेशनचा भारताच्या आर्थिक विकासावर परिणाम होईल आणि देशातील नागरिकांचे जीवनमान सुधारेल का हे जाणून घेणे.
2) शासनाकडून भारतात डिजिटलायझेशनलागू करून डिजिटल इंडियाचे स्वप्न साकार होईल की नाही डिजिटलायझेशनची नवीन विचारधारा प्रभावीपणे कशी कार्य करू शकेल हे जाणून घेणे.
3) भारताच्या आर्थिक विकासावर डिजिटलायझेशनचा प्रभाव स्पष्ट करणे.

*** शोधनिबंधाची गृहितके :-**

1) डिजिटायझेशन मुळे आर्थिक विकासात बदल होत आहे.
2) डिजिटायझेशनमुळे सेवा वितरणात सुलभता झाली आहे.
3) भारताची अर्थव्यवस्था डिजिटल स्वरूपात ओळखली जात आहे.

*** संशोधन पद्धती:-**

प्रस्तुत शोधनिबंधाचे स्वरूप वर्णनात्मक संशोधन पद्धतीवर आधारित आहे.

*** तथ्यसंकलन:-**

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व द्वितीय तथ्य संकलनाचा उपयोग केला आहे. त्यात शासकीय अहवाल, मासिके, संशोधन अहवाल, पुस्तके, वृत्तपत्रे, इलेक्ट्रॉनिक माध्यमे, वेबसाईट इत्यादींचा उपयोग करण्यात आला आहे.

*** भारतात डिजिटायझेशनची आवश्यकता:-**

भारतात डिजिटलायझेशन लागू करणे म्हणजे देशातील सर्व लोकांना डिजिटल स्वरुपात सर्व सेवा उपलब्ध करून देणे, त्यामुळे लोकांना नवीनतम माहिती आणि तंत्रज्ञानाच्या नवकल्पनांचा लाभ मिळेल. खेडी समृध्द आणि प्रगतीसाठी डिजिटलायझेशन फायदेशीर ठरेल. डिजिटलायझेशनव्दारे, डिजिटल लायब्ररी, ऑनलाइन मासिके, ई-पुस्तक विनामूल्य

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

उपलब्ध करून दिली जाऊ शकतात. ज्यामुळे ज्ञानाची देवाण-घेवाण आणि वाढ करण्यात मदत होईल. डिजिटल तंत्रज्ञानाच्या वापरामुळे खेडयापाडयातील लोकांनाही इंटरनेटच्या माध्यमातून जगभरातील सर्व माहिती मिळेल आणि त्यांचा शिक्षणाचा स्तरही वाढेल. 'डिजिटल इंडिया' हा केवळ देशाचा उपक्रम नसून ती या देशाची गरज आहे.[5] जिथे बहुसंख्य लोकसंख्या अजुनही इंटरनेटच्या जगात पोहोचलेली नाही. डिजिटायझेशनचा मुख्य उद्देश भारताला डिजिटली सशक्त समाजात बदलणे हा आहे. भारतातील डिजिटलायझेशनमुळे भारतात डिजिटल पेमेंटच्या वाढीलाही वेग आला आहे. डिजिटलायझेशन पूर्वी, भारतातील सर्व व्यवहारांमध्ये डिजिटल पेमेंटचा वापर फक्त 10 टक्के होता. परंतू नंतरच्या वर्षात ही संख्या 20 टक्याहून अधिक झाली आहे.[6] भारत सरकार डिजिटल इंडिया, मेक इन इंडिया आणि स्टार्टअपस यांसारख्या विविध उपक्रमाद्वारे डिजिटल तंत्रज्ञानाच्या वापरास सक्रियपणे प्रोत्साहन देत आहे. आरोग्य सेवा, शिक्षण, कृषी, व्यापार आणि वाणिज्य इत्यादी क्षेत्रामध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. जेणेकरून भारताची आर्थिक अर्थव्यवस्था मजबूत होऊ शकेल. भारतातील इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या लक्षणीय वाढली आहे. आणि 2025 पर्यंत 1000 दशलक्षापर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. UPI, USSD, आधार पे, IMPS, डेबिट आणि क्रेडिट कार्ड पेमेंट या सारख्या डिजिटल पेमेंटला प्रोत्साहन देण्यासाठी उल्लेखनिय आहे. डिजिटल पेमेंट व्यवहारांमध्ये सरकारचे योगदान हे कॅशलेस सोसायटीचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.[7]

*** मेक इन इंडिया चे आंतरराष्ट्रीय महत्त्व:-**

भारताच्या पंतप्रधानांनी मेक इन इंडिया साठी घेतलेल्या पुढाकारामुळे भारतीय अर्थव्यवस्थेच्या दीर्घ काळापासूनच्या गरजा पूर्ण होणार आहेत. मात्र यात उत्पादने क्षेत्राच्या वाढीवर आणि रोजगार निर्मितीवर भर देण्यात आला असल्याने नेहमीच चुकीने त्याचा संबंध केवळ देशाच्या अर्थव्यवस्थेशीच असल्याचे समजण्यात येते. तसे जरी असले तरी या पुढाकाराला महत्वाचा परदेशी आयाम आहे. आणि अर्थव्यवस्थेतील इतर क्षेत्रांपेक्षा उत्पादन क्षेत्र वेगळे काढता येत नाही.[8]

आज परकीय थेट गुंतवणुकीचा देशात येणारा आणि देशातून बाहेर जाणारा ओघ तसेच वस्तू आणि सेवा यांचा व्यापार याची बेरीज केली तर ती अगदी हात राखून केलेल्या कोणत्याही अंदाजानुसार देखील भारताच्या एकुण देशांतर्गत उत्पादनाच्या निम्यापेक्षा जास्त आहे. उत्पादन आणि सेवा क्षेत्रातील तुलनात्मक आणि स्पर्धात्मक फायद्यांसह विविध घटकांमूळे परकीय क्षेत्रांचा पूर्व प्रभाव दिसून येतो.[9]

मेक इन इंडियाचे उद्देश:-

1) गुंतवणूक आणि वाढ:-

या उपक्रमामूळे भारतात व्यवसाय सुलभता वाढण्यास मदत झाली असून अनेक जागतिक कंपन्यांनी भारतात आपले कारखाने सुरु केले आहेत.

2) स्वदेशी उत्पादनाला चालना :-

देशात वस्तूची निर्मिती व्हावी, आयात कमी करणे आणि व्होकल फॉर लोकल या संकल्पनेला बळ प्राप्त व्हावे हा उद्देश होता.

3) प्रमुख क्षेत्रे:-

या उपक्रमांतर्गत उत्पादन क्षेत्र, पायाभूत सुविधा आणि सेवा क्षेत्रासह एकूण 25 आर्थिक क्षेत्रांचा समावेश करण्यात आला आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

4) रोजगारनिर्मिती:-

देशातील तरुणांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या कौशल्याला वाव देणे.[10]

*** नवोन्मेष आणि भारताच्या प्रगतीला चालना देणारी स्टार्टअप परिसंस्था:-**

भारत आता जगातील सर्वात मोठया स्टार्टअप परिसंस्थापैकी एक आहे. आज उद्योजकता ही केवळ काही शहरांपुरती मर्यादित न राहता एक देशव्यापी चळवळ झाली आहे, जी भारताच्या आर्थिक परिदृश्याला नव्याने आकार देत आहे आणि वाण व रोजगार निर्मितीचे एक इंजिन बनत आहे.

गेल्या दशकातील एक महत्त्वपूर्ण बदल म्हणजे, नवोन्मेष आणि प्रगत तंत्रज्ञानावर वाढलेला भर जागतिक नवोन्मेष निर्देशांकात भारताचा क्रमांक 2015 मधील 81 वरुन 38 पर्यंत सुधारला आहे. डीप-टेक उद्योगांनी सरकारचा पाठिंबा मिळाल्याने यात आणखी सुधारणा होईल. पंतप्रधानाच्या डिजिटल इंडिया उपक्रमावर आधारित एआय (कृत्रिम बुध्दीमत्ता) स्टार्टअप्सची संख्या वेगाने वाढत आहे. डीप-टेक राष्ट्राची उभारणी करण्याच्या पंतप्रधानाच्या दुर दृष्टीमूळे अनुसंधान नॅशनल रिसर्च फाऊंडेशनची स्थापना झाली आहे. तसेच इंडिया एआय मिशन आणि रिसर्च डेव्हलपमेंट ॲन्ड इनोव्हेशन योजना सुरु करण्यात आली आहे.

उद्योजकतेला मिळणारा देशव्यापी पाठिंबा तितकाच महत्त्वाचा आहे. 2016 मध्ये केवळ चार राज्यांमध्ये स्टार्टअप धोरणे होती. त्या तुलनेत आज भारतात 30 हून अधिक राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशामध्ये समर्पित स्टार्टअप कार्यप्रणाली आहेत. आता प्रत्येक राज्यात आणि केंद्रशासित प्रदेशात डीपी आय आयटी मान्यताप्राप्त स्टार्टअप्स आहेत. जी संस्थात्मक पाठिंब्याची खोली आणि तळागाळातील सहभाग अधोरेखित करतात. आतापर्यंत दोन लाखांहून अधिक स्टार्टअप्सना मान्यता मिळाली आहे.

ई-गव्हर्नन्स:-

शासकीय कामकाज आणि सेवा नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी संगणक प्रणाली, इंटरनेट, मोबाईल ॲप्स आणि डिजिटल प्रणालीचा वापर म्हणजे ई-गव्हर्नन्स होय.

ई-गव्हर्नन्सचे फायदे :-

1) पारदर्शकता:- कामात पारदर्शकता येते आणि भ्रष्टाचाराला आळा बसतो.

2) वेळ आणि पैशांची बचत:- नागरिकांना सरकारी कार्यालयात चकरा माराव्या लागत नाहीत, काम

घरबसल्या करता येतात

3) वेगवान सेवा:- अर्ज केल्यानंतर कमी वेळेत सेवा उपलब्ध होतात.

4) उत्तरदायित्व:- कोणत्या अधिकारी व. कर्मचारी वर्गाकडे कामे प्रलंबित आहे हे ट्रॅक करण्यास सोपे जाते.

*** भारतातील डिजिटलायझेशन पुढील आव्हाने:-**

भारतातील डिजिटायझेनाचा विकास मोठ्या प्रमाणात शक्य झाला आहे. आणि त्यांचा देशाच्या अर्थव्यवस्थेवरही परिणाम झाला आहे. परंतु आजही, तंत्रज्ञानामुळे आणि तंत्रज्ञानाच्या जवळपास 4 टक्के लोक संख्या मर्यादित क्षेत्रात आहे. डिजिटल व्यवहार आणि डेटा शेअरिंगमध्ये झालेल्या वाढीमुळे गोपनियतेची आणि डेटा सुरक्षिततेची चिंता वाढली आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

जसजसे डिजिटायझेशन वाढते, तसतसे सायबर धोके आणि हल्ल्याची समस्याही वाढते. आज सायबर सुरक्षा मजबूत करण्याची गरज आहे. तसेच ग्रामीण भागात वीज, ब्रॉडबँड नेटवर्क

कनेक्टिव्हीटी, बँकिंग सुविधांचा अभाव इत्यादी मुलभूत अत्यावश्यक संसाधनांची कमतरता डिजिटायझेशनच्या अंमलबजावणीत अडथळा निर्माण करत आहेत. तसेच ग्रामीण भागातील लोकसंख्या डिजिटल निरक्षर असल्यामूळे डिजिटल माध्यमाचा वापर करू शकत नाही.

*** डिजिटलायझेशनचा अवलंब करण्यासाठी उपाय योजना:-**

डिजिटायझेशन मध्ये करण्यात आलेली गुंतवणूक सर्वात जास्त आहे. परंतु गुंतवणूक ज्या ठिकाणी सर्वात जास्त आवश्यक आहे अशा ठिकाणी केली जावी, म्हणजे ग्रामीण भागात ती सर्व मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी खर्च केली जावी. उदा. वीज पुरवठा, स्वस्त इंटरनेट, ब्रॉडबँड कनेक्टिव्हिटी ,बँकिंग सेवाची व्यवस्था, ऑनलाईन सुविधा प्रदान करणे आणि तांत्रिक जागरूकता या सर्व तांत्रिक कार्यक्रमाचा लाभ लोकांपर्यंत पोहोचू शकतो. सुविधा डिजिटल पेमेंट करताना ऑनलाईन फसवणूकीला सामोरे जाण्यासाठी सायबर सुरक्षा मजबूत केली पाहिजे. चांगले परिणाम साध्य करण्यासाठी, या योजनेने ग्रामीण भारतातील 8.5 लाख आरोग्य कर्मचारी आणि 18 लाखाहून अधिक अंगणवाडी कर्मचाऱ्यांना डिजिटल साक्षर बनवून, जवळजवळ संपूर्ण ग्रामीण लोकसंख्येला डिजिटायझेशनचे फायदे प्रदान करून आणि देशाची अर्थव्यवस्था सुधारून अधिक लक्ष्यित दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे.

निष्कर्ष:-

थोड़क्यात असे स्पष्ट होते की, डिजिटलायझेशन फार पूर्वीपासून सुरू झाले आहे. डिजिटलायझेशनची वाटचाल विकासाकडे सुरू आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांमध्ये डिजिटलायझेशने खूप योगदान दिले आहे. परंतु आजही काही गोष्टी डिजिटल नसण्याचे कारण म्हणजे सुरक्षिततेचा अभाव. ग्रामीण भागात ही इंटरनेटचे काम जोरात सुरू असल्याने ग्रामीण भागातील लोकांनाही तांत्रिक लाभ मिळत आहे. डिजिटलायझेशनचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर मोठ्या प्रमाणावर परिणाम झाला असून नागरिकांचे जीवनमान ही उंचावले आहे. आज बहुतेक लोकांच्या हातात मोबाईल आहे. आणि ते आपली बरीच कामे मोबाईलच्या माध्यमातून करतात. संपूर्ण भारतात तांत्रिक जनजागृती कार्यक्रम राबविल्यास डिजिटलायझेशनच्या माध्यमातून भारताला डिजिटल इंडिया बनवण्याचे स्वप्न नक्कीच साकार होऊ शकेल. अनेक देशांमध्ये आयसीटी च्या वापरामुळे आर्थिक विकास दर वाढण्यास प्रोत्साहन मिळाले आहे. आपल्या देशातही जीडीपीची टक्केवारी पूर्वीपेक्षा खूप वाढली आहे. डिजिटल पेमेंट, ई-गव्हर्नन्स ई- कॉमर्स, आर्थिक समावेशन, ब्रॉडबँड आणि इंटरनेट तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देऊन डिजिटलायझेशनचा आर्थिक वाढीवर सकारात्मक परिणाम झाला आहे. ही वाढ टिकवून ठेवण्यासाठी आणि नागरिकांचे कल्याण वाढवण्यासाठी लोकसंख्येच्या सर्व वर्गांना डिजिटल संधी उपलब्ध असल्याची खात्री करून आव्हानांना सामोरे जाणे आणि तंत्रज्ञानामध्ये अधिक गूंतवणूक करणे महत्त्वाचे आहे.

संदर्भ ग्रंथ:-

1) https://digipay.gov.in.
2) Deepak Mishra, Aarti Reddy, (2026), State of India's Digital Economy, Indian council for Research International Economic Relations., p.g. 66.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

3) Shailly Gupta, Agrima Khanduri (2026), The Rise of the Intelligent Digital Economy, Indian Council for Research on International Economic Relations, p.g. e-Kranti programme. National Governance plan Goverment of India. p.q 15

4) e-Kranti programme. National Governance plan Goverment of India. p.g 26.

5) Digital India Programme (2015), Government of India Digital Transformation Initiative. p.g. 12.

6) World Bank (2021) Digital Governance and Public Sector Reform Washington DC. p.g. 22.

7) Smart Cities Mission (2015), Ministry of Housing and Urban Affairs Government of India.

8) World Bank (2021), Digital Governance and Public Sector Reforms. Washington DC.

9) https://www.ncbi.nim.nih.gov/pmc/article.

10) UN Department of Economics and Social Affairs.

11) Jain, V., Sharma M. (2019) My Gov. Empowering Citizens through Digital Governance in India. Public Administration Review P. g 81

12) Kumar R. & Raj R. (2021), Governance in India: challenges and prospects. Springer.

13) Mehta, R. (2022), Digital India vision for a new India, National Book Trust.